# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.03.2025** **वारःमंगळवार**

---

1. भारत न्यूझीलंड दरम्यान विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण करार
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लेक्सन यांच्या हस्ते दहाव्या रायसीना संवादाचं उद्घाटन
3. छत्तीसगडमध्ये 20 माओवाद्यांची शरणागती
4. युक्रेन संघर्ष संपवण्यासंदर्भात रशिया आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांदरम्यान चर्चा होणार आणि
5. कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष संघांची विजयी सलामी

**भारत ऑस्ट्रेलिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लेक्सॉन यांच्या दरम्यान काल दिल्लीत द्वीपक्षीय चर्चा झाली, त्यानंतर उभय देशांदरम्यान संरक्षण आणि व्यापार संदर्भातल्या प्रमुख क्षेत्रात संबंध दृढ करण्याविषयी सहमती झाली. दोन्ही देशांदरम्यान संरक्षण, शिक्षण, क्रीडा, फलोत्पादन आणि वनसंपदा या क्षेत्रात पाच सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. बैठकीनंतर प्रसारित केलेल्या संयुक्त निवेदनात, उभय देशांदरम्यान संरक्षण आणि सुरक्षा भागीदारीला संस्थात्मक रुप देत ती आणखी मजबूत करण्याचा निर्णय घेतल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. उभय देशांतील परस्पर व्यापार आणि गुंतवणूकवृद्धीसाठी मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचंही मोदी म्हणाले.

उभय देशांदरम्यान व्यावसायिक आणि कुशल कामगारांच्या परस्पर गतिशीलतेला चालना देण्यासाठी व्यवस्था तयार करण्यासंदर्भात वाटाघाटी सुरू केल्याची घोषणाही केली. दहशतवाद, फुटीरतावाद आणि कट्टरतावादी घटकांविरोधात उभय देश परस्परांना सहकार्य करतील असेही मोदी यांनी म्हटले आहे.

दरम्यान न्यूझीलंडचे पंतप्रधान आणि शिष्टमंडळाने काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. राष्ट्रपतींनी उभय देशांदरम्यान मैत्रीपूर्ण घनिष्ट संबंध असल्याचं म्हटलं असून, शैक्षणिक देवाणघेवाण दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांचा महत्त्वाचा पैलू आहे. राष्ट्रपतींनी द्वीपक्षीय व्यापार आणि आर्थिक संबंधांच्या वाढीबद्दल समाधान व्यक्त केले.

**रायसीना संवाद**

रायसीना संवादाच्या दहाव्या आवृत्तीचे उद्घाटन काल संध्याकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी बोलताना, ख्रिस्तोफर लेक्सन म्हणाले की भारत आणि न्यूझीलंड हे जगातल्या आर्थिकदृष्ट्या सर्वात गतिमान प्रदेशाचा भाग आहेत. रायसीना संवादाच्या माध्यमातून जगभरातले विचारवंत हिंदी प्रशांत क्षेत्रातील समकालीन धोरणात्मक आव्हानांवर सामूहिक चर्चा करतात. यंदाच्या रायसीना संवादाची संकल्पना ही कालचक्र- लोक, शांतता आणि वसुंधरा अशी आहे. यामध्ये सव्वाशे देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**राजनाथ**

दिल्लीत काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर विभागाच्या संचालक तुलसी गबार्ड यांच्यादरम्यान चर्चा झाली. या बैठकीदरम्यान दोन्ही नेत्यांनी संरक्षण, सहकार्य आणि गुप्तचर माहितीच्या आदानप्रदानाचा आढावा घेतला.

**लोकसभा चर्चा**

लोकसभेत 2025-26 या वर्षासाठी रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर चर्चा झाली. भाजपचे जनार्दन सिंह सिग्रीवाल यांनी रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या मजबुतीकरणासाठी आणि आधुनिकीकरणासाठी तसंच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात दोन लाख 65 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. चर्चेला सुरूवात करताना काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी सरकारवर भारतीय रेल्वेचे खाजगीकरण करण्याचा कट रचल्याचा आरोप केला. भाजपचे विजय कुमार दुबे, काँग्रेसच्या कुमारी शैलजा, टीडीपीचे केसिनेनी शिवनाथ, तृणमूल काँग्रेसचे सताबादी रॉय आणि समाजवादी पक्षाचे लालजी वर्मा यांच्यासह अनेक सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. आज सभागृहात चर्चा पुढे सुरू राहील.

**अश्विनी वैष्णव-रेल्वे**

रेल्वेच्या पायाभूत सुविधांची सुधारणा आणि प्रवाशांना आरामदायी आणि परवडणारा प्रवास करता यावा यासाठी सरकारनं अनेक पावले उचलल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे मंत्रालयाच्या कामकाजावरील राज्यसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं. गेल्या दहा वर्षांत रेल्वेने पाच लाख रोजगार निर्माण केले आहेत, तसेच देशातील रेल्वे अपघात कमी करण्यावर सतत लक्ष केंद्रित केले असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**राज्यसभा विनियोजन**

राज्यसभेत काल विनियोजन विधेयक 2025, आणि मणिपूर विनियोजन विधेयक 2025 सादर करण्यात आलं. यावरील चर्चेत अनेक सदस्यांनी सहभाग घेतला. भाजपचे डॉक्टर अजित गोपचडे आणि अरुण सिंग, शक्तीसिंह गोहिल आणि काँग्रेसचे जीसी चंद्रशेखर, सीपीआय(एम)चे विकास रंजन भट्टाचार्य, तृणमूल काँग्रेसच्या सुष्मिता देव, आरजेडीचे मनोज कुमार झा आणि बी.ए.पी.चे मनोज कुमार झा, बी.जे.डी.चे मनोज कुमार झा आदींनी चर्चा केली. ही चर्चा आज पुढे सुरु राहाणार आहे.

**नागपूर तणाव**

महाराष्ट्रात मध्य नागपूरच्या महाल भागात दोन गटांमध्ये झालेल्या हिंसाचार आणि तणावानंतर पोलिसांनी नागपूरच्या काही भागात संचारबंदी लागू केली आहे. पुढील आदेशपर्यंत ही संचार बंदी कायम राहील असं पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी सांगितलं आहे. दरम्यान नागपूर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्ववत करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले पोलिस आयुक्तांना दिले आहेत. नागपूरकरांनी शांतता बाळगावी, अफवांवर विश्वास ठेऊ नये आणि प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

**निर्मला सीतारामन**

पंतप्रधान कार्यानुभव योजनेमुळे शिक्षण घेणारी  युवा पिढी आणि कुशल मनुष्यबळाची गरज असणारे देशातील उद्योग क्षेत्र यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल आणि कौशल्य विकासाला चालना मिळून त्याचा राष्ट्रनिर्माणसाठी फायदा होईल असा विश्वास केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केला. नवी दिल्लीत काल केंद्रसरकारच्या पंतप्रधान कार्यानुभव योजने संदर्भात तयार करण्यात आलेल्या विशेष मोबाईल ॲपच उद्घाटन सीतारामन यांच्या हस्ते झाल  त्यावेळी त्या बोलत होत्या. देशात कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधि वाढवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र सरकारने सुरू केलेल्या 5 योजनांच त्यांनी यावेळी कौतुक केल. तसच उद्योग क्षेत्राने ही यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याच आवाहन केल. 2024-25 च्या अर्थसंकल्पांत युवकांसाठी ही पंतप्रधान कार्यानुभव योजना जाहीर करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात 745 जिल्ह्यातील 280 कंपन्यांमध्ये सुमारे सव्वा लाख युवकांना ही पंतप्रधान रोजगार कार्यानुभवची संधी मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून देण्यात आली आहे

**माओवादी**

छत्तीसगड मधल्याबिजापूर जिल्ह्यातील 19 माओवाद्यांनी काल पोलीसांपुढे शरणागती पत्करली. जिल्हा पोलिस निरीक्षक जितेंद्रकुमार यादव यांनी संगितल की, आत्मसमर्पण केलेल्या या 19 माओवाद्यांवर एकंदर 29 लाखांच बक्षिस जाहीर करण्यात आल होत. या सर्वांना राज्याच्या पुनर्वसन धोरणानुसार प्रत्येकी 25 हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. दरम्यान, छत्तीसगडच्या कोंडागांव जिल्ह्यातही

एका माओवाद्याने काल आत्मसमर्पण केल, त्याच्यावर 1 लाख रुपयांच बक्षिस जाहीर करण्यात आल होत. तसच दंतेवाडा जिल्ह्यात मालेवाही भागात काल सी आर पीएफ च्या जवानांच्या पथकाने शोधमोहिमेदरम्यान 5 किलो स्फोटके जप्त केली आणि तत्काळ नष्ट केली.

**पुतीन-ट्रम्प**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यादरम्यान युक्रेन संघर्ष संपवण्याबाबत आज चर्चा होणार आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी या चर्चेविषयी तयारी सुरु आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी संध्याकाळी याबाबत घोषणा केली. युक्रेनमधील युद्ध संपवण्याच्या प्रयत्नांतील हा एक भाग असून जमीन आणि वीज प्रकल्प हे चर्चेचे प्रमुख विषय असतील असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**कबड्डी**

इंग्लंडमध्ये कालपासून विश्वचषक कबड्डी स्पर्धेत आज संध्याकाळी भारतीय पुरूष आणि महिला दोन्ही संघांचे सामने होणार आहेत. महिला संघ ड गटातील वेल्स संघाशी भिडणार आहे तर पुरूष संघ ब गटात स्कॉटलंडशी सामना खेळेल. दोन्ही सामने अनुक्रमे संध्याकाळी साडेपाच आणि रात्री साडेदहा वाजता होणार आहे. स्पर्धेला काल सुरवात झाली असून भारतीय पुरूष संघाने पहिल्याच सामन्यात विजयी सलामी दिली. पुरुषांची स्पर्धा अ आणि ब गटात तर महिलांची स्पर्धा ड आणि ई या दोन गटांत होणार आहे. भारतीय महिला संघ ड गटात खेळत आहे.

**हवामान**

देशात ओडिशाच्या उत्तर भागात तसच गुजरात किनारपट्टी, कोकण, गोवा आणि उत्तर कर्नाटकात येत्या 2 दिवसांत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. तसच ईशान्येकडील राज्ये, ओडीशा आणि तामिळनाडूचा काही भाग, पॉंडेचरी, काराईकल, केरळ, माहे आदि ठिकाणी आज वादळी वारे आणि वीजांच्या कडकडटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.